न्यूज एक्सप्रेस मराठी
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह भाडे वसुली प्रकरणी कारवाई

## 16 जणांवर कारवाई; आमदार शंकर जगताप यांच्या तारांकीत प्रश्नावर एकनाथ शिंदे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या भाडे व अनामत रक्कम वसुलीत तब्बल ५० लाख ७० हजार ६२६ रुपयांचा अपहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणात महापालिकेच्या क्रीडा विभागातील प्रशासन अधिकारी आणि १५ कर्मचाऱ्यांवर कारवाईची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिली. आमदार शंकर जगताप यांनी याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता.

प्रेक्षागृह भाड्याने देताना क्रीडा विभागातील अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचा मुद्दा मांडण्यात आला. यात आमदार जगताप यांनी म्हंटले की, महापालिकेची शहरात पाच नाट्यगृहे व प्रेक्षागृहे आहेत. त्यामधील चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात सन २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीत कार्यक्रमांचा हिशेबच ठेवण्यात आला नसल्याचे तपासणीत उघड झाले. या काळात प्रशासन अधिकारी व इतर कर्मचाऱ्यांनी जमा झालेल्या रकमेची महापालिकेच्या तिजोरीत भर न करता ती थेट स्वतःच्या खिशात घातल्याचे ऑगस्ट २०२३ मध्ये उघडकीस आले. वेळेत धनादेश सादर न केल्याने पालिकेचे नुकसान झाले. क्रीडा विभागाने हा अहवाल पुढील चौकशी व कारवाईसाठी प्रशासन विभागाकडे पाठविला. सुरुवातीला सुमारे २० लाख रुपयांच्या अपहाराचा संशय होता. मात्र, तपासात हा आकडा वाढत गेला. या प्रकरणात लिपिक, मुख्य लिपिक, व्यवस्थापक, प्रशासन अधिकारी यांचीही चौकशी सुरू होती त्यानुसार ४२ लाख ६८ हजार २१५ रुपये वसूलपात्र आणि ८ लाख ३ हजार ४११ रुपये आक्षेपाधीन ठेवण्यात आले. या पार्श्वभूमीवर आमदार जगताप यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबाबत तारांकित प्रश्न उपस्थित केला



“ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या मालमत्तांमधून मिळणारा महसूल हा जनतेचा पैसा आहे. प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहाच्या भाडे वसुलीत झालेला ५० लाख ७० हजार ६२६ रुपयांचा अपहार हा अत्यंत गंभीर प्रकार आहे. सन २०१८ पासून सुरू असलेला हा गैरव्यवहार प्रशासनाच्या डोळ्यादेखत घडला, ही चिंतेची बाब आहे. या प्रकरणी मी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित केला होता, ज्यावर सरकारने दोषींवर कारवाई सुरू असल्याचे स्पष्ट केले आहे. केवळ एका लिपिकाचे निलंबन करून हे प्रकरण थांबणार नाही; यातील मुख्य सूत्रधार आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई झाली पाहिजे आणि अपहाराची संपूर्ण रक्कम व्याजासह वसूल केली पाहिजे. पालिकेच्या तिजोरीवर डल्ला मारणाऱ्या एकाही दोषीला सोडले जाणार नाही,

- शंकर जगताप, आमदार, पिंपरी चिंचवड शहर

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे उत्तर

» याबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, लेखापरीक्षणात हा प्रकार उघडकीस आला असून भाडे वसुली, अनामत रक्कम, पावत्या आणि इतर आकारांची रक्कम यामध्ये अनियमितता झाल्याचे निदर्शनास आले आहे.लेखापरीक्षणानुसार २०१८-१९ ते २०२३-२४ या कालावधीत प्रेक्षागृहातील भाडे वसुली आणि अनामत रकमेची योग्य नोंद न ठेवता पावत्यांची परस्पर विल्हेवाट लावण्यात आल्याचे आढळले. तसेच काही आर्थिक व्यवहारांमधील रक्कम महापालिकेच्या कोषागारात जमा झाल्याचे नोंदीत दिसत नसल्याचेही अहवालात नमूद करण्यात आले आहे. यामध्ये प्रेक्षागृहातील लिपिक, मुख्य लिपिक तसेच प्रभारी व्यवस्थापक यांच्यावर ठपका ठेवण्यात आला आहे. या प्रकरणात एका लिपिकाला निलंबित करण्यात आले असून विभागीय चौकशी सुरू आहे. तसेच संबंधित कर्मचाऱ्यांच्या कार्यकाळाचा तपशील हजेरी पुस्तकाच्या आधारे निश्चित करण्यात आला आहे. लेखापरीक्षण अहवालानुसार संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात आला आहे. या सर्व प्रकरणाची पुढील चौकशी सुरू असून दोषी आढळणाऱ्यांवर नियमांनुसार कारवाई केली जाईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानसभेत दिलेल्या लेखी उत्तरात स्पष्ट केले आहे.

---

# महापालिकेच्या शहर अभियंता पदाच्या विविध विभागांच्या कार्यभाराचे तात्पुरता स्वरूपात वाटप

## शहर अभियंता मकरंद निकम सेवानिवृत्त; प्रमोद ओंभासे, मनोज सेठिया, सुनील भागवानी यांच्याकडे विविध विभागांचा अतिरिक्त कार्यभार सोपवला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेचे शहर अभियंता मकरंद निकम हे महापालिका सेवेतून २८ फेब्रुवारी २०२६ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यामुळे शहर अभियंता निकम यांच्या कडील विविध विभागांचा कार्यभार तात्पुरता स्वरूपात महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता मनोज सेठिया आणि सुनील भागवानी यांच्याकडे




सोपवण्यात आला आहे, याबाबतचे आदेश आज निर्गमित केलेले आहेत.

सामान्य प्रशासन विभागाच्या वतीने काढण्यात आलेल्या आदेशानुसार मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे यांच्याकडे त्यांच्याकडील सध्याच्या पाणी पुरवठा व प्रकल्प विभागासह स्थापत्य विभागाच्या अतिरिक्त कार्यभाराची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सह शहर अभियंता मनोज सेठिया यांच्याकडे त्यांच्याकडील सध्याच्या स्थापत्य मुख्य कार्यालय विभागासह उद्यान व क्रीडा स्थापत्य, शहरी दळणवळण या विभागांचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे

तसेच सह शहर अभियंता सुनील भागवानी यांच्याकडे त्यांच्याकडील सध्याच्या विभागासह बांधकाम परवानगी व अनाधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे.

# तळवडे आयटी पार्क चौकातील स्वागत कमानीचे काम रखडले

## संथ कारभारामुळे वाहतूक कोंडीत भर, नागरिक आणि वाहनचालकांमधून संताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

देहू-आळंदी रस्त्यावरील तळवडे आयटी पार्क चौक येथे श्री क्षेत्र देहूच्या स्वागत कमानीचे काम गेल्या अनेक महिन्यांपासून रखडल्याने परिसरातील नागरिक आणि वाहनचालकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे आणि ठेकेदाराच्या अतिशय संथ कारभारामुळे या महत्त्वाच्या चौकात दररोज मोठी वाहतूक कोंडी होत असून, याचा फटका आयटी कर्मचारी आणि भाविकांना बसत आहे. धक्कादायक बाब म्हणजे, मुदतीत काम पूर्ण न झाल्याने ठेकेदारावर दंडात्मक कारवाई करूनही कामाच्या गतीत कोणतीही सुधारणा झालेली नाही.



देहू-आळंदी रस्ता हा श्री क्षेत्र देहू आणि आळंदी या दोन तीर्थक्षेत्रांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. या मार्गावर देहू महापालिका हद्दीवर भव्य स्वागत कमान उभारण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मे. द रायकॉन कन्स्ट्रक्शन या संस्थेला जून २०२२ मध्ये या कामाचा आदेश देण्यात आला होता. निविदेतील अटींनुसार हे काम एप्रिल २०२५ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते. मात्र, संबंधित ठेकेदाराने कामाकडे दुर्लक्ष केल्याने विहित मुदतीत काम पूर्ण होऊ शकले नाही. कामाचा वेग वाढवण्यासाठी महापालिकेच्या शहरी दळणवळण विभागाने वारंवार सूचना देऊनही ठेकेदाराने त्याकडे कानाडोळा केल्याचे समोर आले आहे.

कामातील या दिरंगाईमुळे प्रशासनाने मे २०२५ पासून संबंधित ठेकेदारावर दररोज २ हजार रुपये दंड आकारण्यास सुरुवात केली आहे. मात्र, दंडाची कारवाई होऊनही कामात प्रगती होत नसल्याने अखेर महापालिकेने कठोर पाऊल उचलण्याचे संकेत दिले आहेत. सध्या या ठिकाणी उभारलेल्या लोखंडी सांगाड्यामुळे (स्केफोल्डिंग) रस्त्याची रुंदी कमी झाली असून, त्यामुळे रहदारीच्या वेळेला भीषण वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. संत तुकाराम महाराज बीज सोहळा निमित्ताने या मार्गावर वारकरी आणि भाविकांची मोठी गर्दी असते. ही परिस्थिती लक्षात घेता, प्रशासनाने आता या ठेकेदारावर 'टेंडर व्हॉल्यूम-२' मधील क्लॉज-३ सी अन्वये कारवाई करण्याचा आणि उर्वरित कामासाठी फेरनिविदा काढण्याचा प्रस्ताव आयुक्तांकडे सादर केला आहे. वाहतुकीला अडथळा ठरणारे लोखंडी सांगाडे तातडीने हटवण्याची कार्यवाही देखील सुरू करण्यात आली आहे. वारंवार सूचना देऊनही काम न करणाऱ्या ठेकेदारांमुळे सर्वसामान्यांना मात्र नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

> **"तळवडे आयटी पार्क चौकातील रखडलेल्या स्वागत कमानीच्या कामामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. कामाची गती अत्यंत संथ असल्याने या ठिकाणी अपघात आणि वाहतूक कोंडीच्या तक्रारी वाढल्या आहेत. या गंभीर प्रश्नी प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन संबंधित दोषी ठेकेदारावर कडक कारवाई करावी आणि हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशा मागणीचे लेखी निवेदन मी महापालिका प्रशासनाला दिले आहे."**
> **- विकास साने, नगरसेवक**

# भोसरी विभागात लाईनमन दिन उत्साहात साजरा

## लाईन स्टाफचा गौरव; सुरक्षिततेची शपथ आणि डिजिटल टेस्टरचे वितरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

४ मार्च रोजी लाईनमन दिनानिमित्त महावितरणच्या भोसरी विभागात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून हा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. वीज वितरण व्यवस्था सुरळीत व अखंडित ठेवण्यासाठी प्रत्यक्ष क्षेत्रात काम करणाऱ्या लाईनमन व ग्राउंड मेंटेनन्स कर्मचाऱ्यांच्या समर्पित सेवेला गौरविण्यासाठी दरवर्षी ४ मार्च रोजी लाईनमन दिन साजरा केला जातो.






सर्वप्रथम कार्यक्रमास उपस्थित सर्व लाईन स्टाफचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून गणेशखिंड शहर मंडळाचे अधीक्षक अभियंता मा. श्री. सिंहाजीराव गायकवाड उपस्थित होते. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात लाईन स्टाफच्या कार्याचे कौतुक करत त्यांच्या कर्तव्यनिष्ठा, धाडस व सेवाभावाचा गौरव केला. तसेच सर्व कर्मचाऱ्यांनी काम करताना सुरक्षिततेचे नियम काटेकोरपणे पाळून जबाबदारीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी सर्व अभियंते व लाईन स्टाफ यांनी सुरक्षिततेची शपथ घेतली. तसेच लाईन स्टाफच्या सुरक्षिततेसाठी मा. अधीक्षक अभियंता यांच्या हस्ते डिजिटल टेस्टरचे वितरण करण्यात आले.





कार्यक्रमादरम्यान पुणे परिमंडळ प्रशिक्षण केंद्रातील उपकार्यकारी अभियंता सौ. कांचन भोसले मॅडम यांनी लाईन स्टाफला विद्युत कामकाज करताना आवश्यक सुरक्षा नियमांचे पालन करण्याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. अतुल भिमराव देवकर, कार्यकारी अभियंता, भोसरी विभाग यांनीही आपल्या मनोगतातून लाईन स्टाफच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करत सर्व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास भोसरी विभागांतर्गत सर्व उपविभागांचे अतिरिक्त कार्यकारी अभियंता श्री. सोमनाथ माने, श्री. राजेश भगत, श्री. अशोक जाधव, श्री. किरण सरोदे तसेच सर्व शाखा अभियंते व लाईन स्टाफ उपस्थित होते.

या कार्यक्रमामुळे लाईन स्टाफमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून सुरक्षित व कार्यक्षम सेवा देण्याचा संकल्प सर्वांनी व्यक्त केला.

# पावसाळापूर्व कामांसाठी 150 कोटींचा निधी; क्षेत्रीय कार्यालयांवर मोठी जबाबदारी

## रस्ते दुरुस्ती, नाले-ड्रेनेज सफाईसाठी निधी वाटप; महिनाभरात निविदा पूर्ण करण्याचे निर्देश

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी यंदा १५ क्षेत्रीय कार्यालयांना पावसाळापूर्व रस्ते दुरुस्ती, नाले आणि ड्रेनेज सफाईसाठी प्रत्येकी १० कोटी रुपये असे एकूण १५० कोटींचा निधी उपलब्ध करून दिला आहे.

या निधीतून पुढील महिनाभरात निविदा प्रक्रिया पूर्ण करून कार्यादेश देणे आणि प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याची जबाबदारी संबंधित क्षेत्रीय कार्यालयांवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे परिमंडळ उपायुक्त आणि क्षेत्रीय कार्यालयांची मोठी कसोटी लागणार आहे. कामे वेळेत पूर्ण न झाल्यास त्याचा थेट फटका पुणेकरांना बसण्याची शक्यता आहे. दरवर्षी मुख्य पथ विभाग आणि ड्रेनेज विभागामार्फत पावसाळापूर्व कामे केली जातात. यासाठी संपूर्ण शहराचे झोननिहाय विभाजन करून निविदा काढल्या जातात.




### पावसाळापूर्व कामांसाठी १५० कोटींचा निधी

**» पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी पावसाळ्यापूर्वी शहरातील रस्ते, नाले आणि ड्रेनेज यांची दुरुस्ती व स्वच्छता करण्यासाठी १५ क्षेत्रीय कार्यालयांना प्रत्येकी १० कोटी रुपये असे एकूण १५० कोटी रुपयांचा निधी दिला आहे. या निधीतून खड्डे दुरुस्ती, पदपथांची देखभाल, नाले व पावसाळी लाईनची सफाई आदी कामे केली जाणार आहेत. निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना सुरुवात करण्याची जबाबदारी क्षेत्रीय कार्यालयांवर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी शहरातील मूलभूत सुविधा सुधारण्यासाठी प्रशासनाकडून तयारी सुरू झाली आहे.**

या अंतर्गत खड्डे दुरुस्तीसाठी १ कोटी, देखभाल-दुरुस्तीच्या कामांसाठी ३ कोटी, पदपथ व त्यावरील सार्वजनिक कामांसाठी २ कोटी असे एकूण ९० कोटी रुपये देण्यात आले आहेत. तसेच, ड्रेनेज सफाईसाठी प्रत्येकी १ कोटी, पावसाळी लाइन सफाईसाठी १ कोटी आणि नाले सफाईसाठी १ कोटी असे मिळून ४५ कोटींचा निधी देण्यात आला आहे.याशिवाय समाविष्ट गावांतील नाले सफाईसाठी स्वतंत्र १ कोटी रुपये देण्यात आले आहेत. अशा प्रकारे एकूण १५० कोटींचा निधी वितरित करण्यात आला आहे.

मात्र, मार्च महिना सुरू होऊनही आणि चालू आर्थिक वर्ष संपण्यास अवघा एक महिना शिल्लक असतानाही अनेक क्षेत्रीय कार्यालयांनी अद्याप निविदा प्रक्रिया सुरू केलेली नाही. त्यामुळे प्रशासनाला उर्वरित काळातच निविदा प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष कामांना सुरुवात करावी लागणार आहे.क्षेत्रीय कार्यालयांचे अधिकार वाढविण्याचा निर्णय घेतल्यानंतर मुख्य खात्यांतील अधिकाऱ्यांनीच ही कामे क्षेत्रीय पातळीवर देण्याची मागणी केली होती. सध्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांना १० लाख आणि परिमंडळ उपायुक्तांना २५ लाख रुपयांपर्यंत खर्चाचे अधिकार आहेत.

संबंधित निविदा स्थायी समितीच्या मान्यतेसाठी येणार असल्या तरी प्राथमिक प्रक्रिया क्षेत्रीय स्तरावर होत असल्याने त्यात अनियमिततेची शक्यता व्यक्त केली जात आहे.या पूर्वी काही क्षेत्रीय कार्यालयांत प्रत्यक्ष काम न करता बिले काढल्याचे प्रकार समोर आल्याचेही नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र अतिरिक्त आयुक्तांची नियुक्ती करावी, अशी मागणी माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि प्रशांत बधे यांनी स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.

### क्षेत्रीय कार्यालयांची मोठी कसोटी

**» पावसाळापूर्व कामांची जबाबदारी यंदा मुख्य विभागांऐवजी क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आली आहे. मनुष्यबळाची कमतरता असल्याने मुख्य पथ आणि ड्रेनेज विभागाऐवजी परिमंडळ उपायुक्त व क्षेत्रीय अधिकाऱ्यांना कामे पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर मोठी जबाबदारी आली आहे. निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण करून कामे प्रत्यक्षात सुरू न झाल्यास पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे प्रशासनाकडून कामांवर बारकाईने लक्ष ठेवले जाणार आहे.**

### अनियमिततेबाबतही व्यक्त चिंता

**» निधीचे वितरण झाल्यानंतरही अनेक क्षेत्रीय कार्यालयांनी अद्याप निविदा प्रक्रिया सुरू केलेली नसल्याची माहिती समोर आली आहे. आर्थिक वर्ष संपण्यास अवघा एक महिना उरला असताना कामे सुरू न झाल्याने चिंतेचे वातावरण आहे. पूर्वी काही ठिकाणी प्रत्यक्ष काम न करता बिले काढल्याचे प्रकार समोर आल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रक्रियेवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र अतिरिक्त आयुक्त नेमण्याची मागणी माजी विरोधी पक्षनेते उज्ज्वल केसकर, सुहास कुलकर्णी आणि प्रशांत बधे यांनी स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे.**

# मेट्रो स्थानकांजवळ पार्किंग ! पुणे महापालिकेने घेतला निर्णय

## पुणे मेट्रो स्थानकांजवळ प्रवाशांच्या सोयीसाठी महापालिका 31 नवीन पार्किंग स्थळे विकसित करणार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील वाढत असलेली वाहनांची संख्या कमी करण्यासाठी महापालिकेने विविध उपयोजना करण्यास सुरुवात केली आहे. पीएमपीएमएलचे सक्षमीकरण, मेट्रोचे विस्तारीकरण असे अनेक उपाय केले जात आहेत. शहरातील दोन मार्गावर मेट्रो प्रकल्प सुरु झाल्याने मेट्रोचा वापर करण्यास नागरिकांनी सुरुवात केली आहे.

नागरिकांकडून मेट्रोचा वापर केला जातो. पण अनेक ठिकाणी मेट्रो स्टेशनपासून घरापर्यंत जाण्यासाठी आवश्यक ती फिडर सेवा उपलब्ध नसल्याने नागरिक दुचाकी वाहन घेऊन मेट्रो स्टेशनपर्यंत येतात. मात्र गाडी लावण्यासाठी पार्किंग उपलब्ध




होत नसल्याने अडचणी येतात. त्यामुळे अनेक नागरिक मेट्रो ऐवजी खासगी वाहनाचा वापर करत असल्याचे समोर आले आहे.

नागरिक मेट्रो स्टेशन वाहने लावण्याची सुविधा उपलब्ध करून दिल्यास मेट्रोचा वापर करण्याचे प्रमाण वाढणार आहे. याचा सर्वकष अभ्यास करून मेट्रो स्थानकांच्या परिसरात प्रवाशांची वाहने उभी करण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी महापालिकेने पुढाकार घेतला आहे. महापालिकेच्या मालकीच्या ३१ जागांवर पार्किंग विकसित करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. महापालिकेच्या प्रकल्प विभागातील मुख्य अभियंता दिनकर गोजारे यांनी ही माहिती दिली.

नागरिकांनी सार्वजनिक वाहतुकीचा अधिकाधिक वापर करावा, या उद्देशाने पीएमपी बससेवेबरोबरच शहरात मेट्रो मार्ग तयार करण्यात आले. सध्या शहरात दोन मार्गांवर मेट्रो धावत आहे. मात्र, मेट्रो स्थानक परिसरात वाहने उभी करण्यासाठी नागरिकांना जागा नसते. पार्किंगची सोय नसल्याने अनेक प्रवासी वाहनाचाच पर्याय स्वीकारतात. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेने पुढाकार घेतला आहे.प्रकल्प विभागाचे प्रमुख दिनकर गोजारे म्हणाले, ‘मेट्रो स्थानकाजवळ ३१ ठिकाणी पार्किंग व्यवस्था विकसित करण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला आहे.

### मेट्रो स्थानकांजवळ पार्किंगची सुविधा

**» पुणे शहरात सार्वजनिक वाहतूक वाढवण्यासाठी महापालिकेने मेट्रो स्थानकांजवळ पार्किंगची सुविधा उभारण्याचा निर्णय घेतला आहे. अनेक नागरिक मेट्रोने प्रवास करू इच्छितात; मात्र स्थानकांजवळ वाहन पार्किंगची सोय नसल्याने त्यांना अडचणी येतात. ही समस्या लक्षात घेऊन महापालिकेने शहरातील स्वतःच्या मालकीच्या ३१ मोकळ्या जागांवर पार्किंग विकसित करण्याची योजना आखली आहे. या ठिकाणी पार्किंगची व्यवस्था झाल्यास नागरिकांना दुचाकी किंवा चारचाकी वाहन सुरक्षितपणे उभी करून मेट्रोने पुढील प्रवास करणे सोपे होईल. त्यामुळे खासगी वाहनांचा वापर कमी होऊन मेट्रो प्रवाशांची संख्या वाढण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.**

# बेशिस्त रिक्षाचालकांवर आरटीओचा दंडाचा बडगा

## पुण्यात 175 रिक्षाचालकांवर कारवाई; सहा परवाने निलंबित, सुमारे 55 लाखांचा दंड वसूल

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील रिक्षाचालकांकडून मीटर पद्धतीने भाडे न आकारता मनमानी भाडे आकारणाऱ्या १७५ बेशिस्त रिक्षाचालकांविरोधात उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून (आरटीओ) कठोर कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये सहा रिक्षाचालकांचे परवाने तात्पुरते निलंबित करण्यात आले असून, उर्वरित रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाईतून सुमारे ५५ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

राज्य परिवहन विभागाच्या निर्देशानुसार स्थानिक पातळीवर 'आरटीओ' अधिकाऱ्यांच्या अखत्यारीत रिक्षाचालकांना प्रवासी भाडे आकारण्यासंदर्भात सूचना करण्यात आल्या आहेत. त्यानुसार रिक्षाचालकांसाठी पहिल्या १.५ किलोमीटरसाठी २६ रुपये दर ठरवून देण्यात आला आहे. त्यापुढील प्रत्येक किलोमीटरसाठी १७.१४ रुपये अशी दरआकारणी निश्चित करून दिली आहे.



### कारवाईचे स्वरूप

» कारवाईमध्ये जादा भाडे आकारलेले २९, मीटरमध्ये छेडछाड करून जादा भाडे आकारणारे १०, क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन जाणारे १, नियमापेक्षा जादा भाडे आकारणारे १०, प्रवाशांसोबत उद्धट वर्तन करणारे १७ आणि इतर सूचनांचे पालन किंवा फलक न लावणे अशा कारणास्तव अशा एकूण १७४ रिक्षा चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

त्यापेक्षा अवाजवी भाडे आकारण्यास बंदी घालण्यात आली असून, प्रवाशांची अडवणूक न करता मीटरप्रमाणेच सेवा देण्याबाबत सूचना करण्यात आल्या आहेत. याबाबत जनजागृती करून रिक्षामध्ये दर्शनी भागात मीटरच्या दराबाबत फलकही लावावा, अशा सूचना दिल्या आहेत. मात्र, अनेक रिक्षाचालकांकडून आरटीओच्या नियमांना बगल देत थेट मनमानी पद्धतीने भाडे आकारले जात आहे.

अनेक बेशिस्त रिक्षाचालकांकडून प्रवासी भाडे आकारणीवरून अडवणूक करून प्रवाशांबरोर हुज्जत, भांडणे, उद्धट वर्तन, मीटरमध्ये फेरफार करून जादा भाडे आकारणी केली जात आहे. अशा बेशिस्त रिक्षाचालकांबाबत वारंवार तक्रारी वाढल्या असताना आरटीओ प्रशासनाकडून कारवाईचा बडगा उगारण्यासाठी शोध मोहीम हाती घेण्यात आली. जानेवारी महिन्यात ४७७ रिक्षांची तपासणी करण्यात आली.

### बेशिस्त रिक्षाचालकांवर कारवाई

» पुणे शहरात मीटरप्रमाणे भाडे न आकारता मनमानी करणाऱ्या रिक्षाचालकांवर उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) मोठी कारवाई केली आहे. जानेवारी महिन्यात करण्यात आलेल्या तपासणीत ४७७ रिक्षांची पाहणी करण्यात आली. त्यापैकी नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७५ रिक्षाचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. वारंवार नियम मोडणाऱ्या सहा रिक्षाचालकांचे परवाने तात्पुरते निलंबित करण्यात आले आहेत. तसेच उर्वरित चालकांकडून सुमारे ५५ लाख रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. प्रवाशांकडून मीटरप्रमाणेच भाडे आकारावे आणि अडवणूक करू नये, अशा सूचना आरटीओकडून देण्यात आल्या असून नियम मोडणाऱ्यांवर पुढेही कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

> **“ रिक्षाचालकांना मीटरप्रमाणे भाडे आकारण्याबाबत निर्देश देण्यात आले असून, या नियमाचे पालन न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. रिक्षाचालकांनी अडवणूक केल्यास थेट ८२७५३३०१०१ या व्हॉट्सअॅप क्रमांकावर तक्रार, छायाचित्र आणि नंबर पाठवावा. प्राप्त तक्रारींवर ताबडतोब कारवाई करण्यात येणार आहे..**
>
> **- स्वप्नील भोसले, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे**

# शिरूर तालुक्यात दुबार मतदारांचा मुद्दा ऐरणीवर

## ग्रामपंचायत निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार यादीतील नावे तत्काळ रद्द करण्याची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये काही ठिकाणी अगदी काठावर काही जागा पडल्या, तर काही जागा जिंकल्या, निवडणूक म्हटलं की हार-जित आलीच; मात्र शिरूर तालुक्यातील पुणे-नगर रस्त्यावरील जिल्हा परिषद गट असो की शिरूर ग्रामीण-न्हावरे जिल्हा परिषद गट या ठिकाणी भाडेकरू म्हणून राहणाऱ्या मतदारांनी निवडणूक प्रक्रियेमध्ये जो काही रंग दाखवला, त्याचा धसका आगामी ग्रामपंचायतच्या पार्श्वभूमीवर स्थानिक गाव कारभारी यांनी घेतला आहे. त्यामुळेच मतदार नोंदणी असणाऱ्यांची नावे कोणत्यातरी एक ठिकाणी तत्काळ रद्द करा, अशी मागणी पुढे येऊ लागली आहे.



औद्योगिक वसाहतीमुळे मोठ्या प्रमाणातील बाहेरगावातील कामगार औद्योगिक परिसरातील गावांमध्ये स्थिर-स्थावर झाला आहे, रूम भाड्याने जातात, या कारणाने या परिसरातील बहुतांशी जणांनी कॉलनीच्या कॉलनी उभ्या केल्या आहेत. शाश्वत रोजगाराची हमी असल्याने कामगारही त्या ठिकाणी रमतो. औद्योगिक वसाहत असली, तरीही या परिसरातील आजही ग्रामीण टच असल्याने ज्या खोली मालकाच्या खोल्यांमध्ये हे कामगार राहतात, त्यांना सामाजिक सुरक्षा मिळत असल्याने वर्षानुवर्षे ती मंडळी रूम बदलत नाही. स्थानिक मंडळी आपला मतदार वाढला पाहिजे, या भावनेने गावच्या मतदार यादीत या बाहेरच्या कामगारांचे नाव नोंदवून घेतात आणि त्यांना मतदार हे बिरुद मिळाल्यानंतर, खरी कहाणी सुरू होते.

गाव-गाड्याच्या सत्ताकारणावर मांड ठोकण्यासाठी हक्काचा मतदार म्हणून ज्यांना मतदार नोंदणीसाठी मदत केली, तीच माणसं दोन्हीही बाजूंकडून निवडणुकीच्या काळात येणारे गूळ-खोबरं दोन्ही हाताने घेतात व स्थानिकांचं गणित बिघडून टाकतात. बरं यातील बहुतांश लोकांची आपल्या मूळ गावी मतदार म्हणून नोंद असते. त्या भागातील निवडणुका असतील तर ही माणसं आपला मताचा हक्क नोंदवण्यासाठी आपल्या मूळ गावी जातात, हेदेखील वास्तव आहे.

निवडणुका प्रचंड खर्चिक झाल्याने व बाहेरगावचा मतदार हा उगवत्या सूर्याला नमस्कार करीत असल्याने गाव-गाड्यावर मांड ठोकायची असेल, तर दुबार मतदार नकोच, ही भावना आता बळावली आहे. अनेक गावांमध्ये मूळ गावकऱ्यांपेक्षा बाहेरून आलेल्या मतदारांचं वर्चस्व जास्त दिसतं किंवा त्यांनी गाव सोडले असले, तरी त्यांची नावे आजही गावच्या मतदार यादीत असते. ग्रामपंचायत निवडणुकांसाठी याद्या अद्ययावत करण्याचं काम सध्या घडीला युद्ध पातळीवर सुरू आहे.

### दुबार मतदारांचा वाढता प्रभाव

» निमोणे परिसरात औद्योगिक वसाहतीमुळे मोठ्या प्रमाणात बाहेरगावचे कामगार स्थायिक झाले असून त्यांची नावे स्थानिक मतदार यादीत नोंदवली गेली आहेत. काही ठिकाणी या मतदारांची नावे त्यांच्या मूळ गावातही कायम असल्याने दुबार मतदारांची समस्या निर्माण झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये या मतदारांचा मोठा प्रभाव दिसून आला. दोन्ही बाजूंनी होणाऱ्या राजकीय व्यवहारांमुळे स्थानिक राजकीय समीकरणे बिघडत असल्याची तक्रार गावकऱ्यांकडून होत आहे. आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने दुबार मतदारांची नावे तातडीने रद्द करावीत, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे